# नागरिकांचे सबलीकरण आणि भ्रष्टाचार निर्मूलन
# माहिती अधिकार अधिनियम, २००५
# भाग १ – नागरिकांचे सबलीकरण

## प्रास्ताविक

केंद्र सरकरच्या मार्गदर्षक (http://www.epfindia.com/sites/pdf/RTI_1.pdf), तत्वानुसार माहिती अधिकार अधिनियमाचा उद्देष खाली दिल्याप्रमाणे आहेत:

१. नागरिकांचे सबलीकरण.
२. पारदर्षकता व उत्तरदाईत्व आणणे.
३. भ्रष्टाचार काबूत ठेवणे.
४. सुशासन आणणे आणि खऱ्या अर्थाने लोकशाही नागरिकांसाठी कार्यरत करणे.

वरील उद्देषांमध्ये सर्वात महत्वाची आणि लक्ष्य करण्यासारखी बाब म्हणजे आपले केंद्र सरकारने भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्याऐवजी भ्रष्टाचार काबूत ठेवण्यासाठी माहिती अधिकार अधिनियम अमलात आणला आहे. म्हणजे २जी, ३ जी, सीवायजी, सीजी इत्यादीच्या पातळीवर भष्टाचार ठेवण्याची त्यांची इच्छा आहे असे स्पष्ट होते.

माहिती अधिकार अधिनियम हा सुशासन आणण्यासाठी नागरिकांचा एक अनमोल हक्क आहे. सुशासनाचा अर्थच आहे की शासनात नागरिकांचा सहभाग असणे. परंतू याचा अर्थ नाही की नागरिकांनी त्यांचे प्रतिनिधी निवडल्यावर त्यांचा सहभाग संपतो. जर मालकाला त्यांचा नोकर काय काम करत आहेत हे महित नसले तर मालकाचा म्हणजे नागरिकांचा सहभाग किंवा त्यांची नोकरावर म्हणजे लोक प्रतिनिधींवर देखरेख असू शकत नाही.

माहिती राज्याच्या मालकीची नाही. माहिती शासनाच्या मालकीची नाही. माहिती लोकप्रतिनिधी किंवा अधिकाऱ्यांच्या मालकीची नाही. माहितीची मालकी ही जनतेची आहे. शासन माहिती जनतेसाठी निर्माण करते. जनतेच्या कल्याणासाठी जेनतेच्या पैशातूनच माहिती संघठीत केली जाते. म्हणूनच राज्य किंवा सार्वजनिक प्राधिकरण जनतेपासुन माहिती लपवून ठेवू शकत नाही.

माहिती ही एक शक्ती आहे. त्यापासुन आम्हाला सबलीकरण मिळते, शासनात पारदर्षकता आणि उत्तरदायित्व मिळते, भष्टाचाराचे निर्मूलन होते कारण पारदर्षकता ही भ्रष्टाचार निर्मूलनासाठी एक मोठी दहशत आहे.

## नागरीकांचे सबलीकरण कसे होते ?

माहिती न देण्याचा अभिरोध हा आपल्याला ११०० वर्षाचा परकीय लोकांचा भारतावर राज्य केल्याचा वारसा आहे. त्यापैकी २०० वर्षे इंग्रजी किंवा गोव्यात पोर्तुगज लोकांचे आपल्यावर राज्य होते. परकीय सत्ताधाऱ्यांचे तत्व होते की जरुर तीच माहिती गुलामांना द्यावयाची. हे सत्ताधारी आपल्या देशाची संपत्ती लुटत होते म्हणून किती संपती लूटत होते व त्यासाठी काय काय पर्याय वापरात आणत होते याबद्दल माहिती मिळणे अशक्य होते. आपल्या स्वराज्यात सुद्धा आता तेच दिसत आहे कारण आपले भारतीय मातब्बर सुध्दा सत्ताधारी देशाच्या संपत्तीची लुटालूट करत आहेत. काही प्रभावशाली नेते एक पाऊल पुढे आहेत. ते आम आदमीच्या साधनसंपत्तीची सुध्दा लुटालूट करत आहेत. आपल्या वोट ब्यांकांसाठी पिण्याच्या पाण्याचासुध्दा गैर वापर होत आहे. विकास करावयाचा तो सुध्दा फक्त आपल्या मतदार संघाचाच करावयाचा, भार नियामन करावयाचे ते आपला मतदार संघ सोडून इतर भागात करायचे, मग त्यात देशाचा फायदा असो किंवा नसो. महाराष्ट्र राज्यामध्ये बारामती व उत्तर प्रदेशात राय बरेली ही दोन उदाहरणे डोळ्यासमोर येतात.

माहिती अधिकार अधिनियम आल्यापासुन गेल्या सात वर्षात सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्यस्त प्रवृत्तीमध्ये थोडाफार बदल नक्कीच झाला आहे. परन्तु माहिती अधिकारामुळे उघड झालेल्या काही मोठ्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणामुळे सत्ताधारी अभिजनांच्या प्रवृतीमध्ये बदल होऊन एक नवीन तत्व उभारण्यात आले आहे, ''मला तुम्ही कोण माणुस आहे ते सांगा आणि मी तुम्हाला कायदा लागू होतो किंवा नाही हे सांगतो''. त्यामळे जर नागरिकाने असुखकारक माहिती विचारली तर ती पुरविली जात नाही. नुकतेच मुंब्रा येथे पडलेल्या अवैध बांधकामाबद्दल बोलताना राष्ट्रवादी पक्षाचे जितेंद्र आवाड यांनी सांगितले की ७०हुन जास्त मृत्यु घडल्या प्रकरणी त्यांची जबाबदारी नाही कारण जर बांधकाम बेकायदेशीर होते तर त्याला पाणी आणि वीज का दिली गेली? ते विसरले की त्यांच्या दबावामुळेच अवैध बांधकाम झाले. पाणी आणि वीज नंतर आली आणि ते सुध्दा त्यांच्याच दबावामुळे.

ह्या मुद्यावरुन माहिती अधिकाराचा अंत झाला की त्याचा हळुवार अंत होत आहे की त्याला अगोदरच अतिदक्षता विभागात दाखल केले गेले आहे या बाबत चर्चा करणे योग्य होईल.

**माहिती अधिकाराचा अंत म्हणजे नागरिकांचे सबलीकरण सुध्दा संपले**

इंडिअन एक्सप्रेस ९ एप्रिल २०१३च्या अंकात प्रसिध्द झाले आहे की महाराष्ट्र राज्यातील दिनेश सुर्यवंशी यांनी १२ जानेवारी २०१२ रोजी अनुसुचित जाति व जमातिसाठी राखीव जागांबद्दल माहिती मागविली होती कारण त्यात गैरप्रकार झाल्याचा त्यांना संशय होता. त्यांनी केलेल्या पहिल्या अपिलाची सुनावणी अजुन झालेली नाही. प्राथमिक व दुय्यम शिक्षणाचे निर्देशकांनी उपनिर्देशंकांना २ नोव्हेंबर २०१२ रोजी दिलेल्या कारणे दाखवा नोटीशीनंतर सुध्दा त्यांना माहिती मिळाली नाही.

दुसरे अपिल केले तर दोन वर्षे त्याची सुनावणी होईल किंवा नाही या बद्दल सुद्धा आता शाश्वती राहीली नाही. माहिती आयुक्तांमध्ये एक नवा कल दिसुन येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती दिली नाही किंवा टाळाटाळ केली किंवा दिशाभूल करणारी माहिती दिली तर दर दिवसाच्या विलंबासाठी रु. २५० व जास्तीतजास्त रु.२५००० पर्यंत शास्ती लावण्यात येऊ शकते. परन्तू माहिती आयुक्त माहिती अधिकाऱ्यांना सावधान करुन माहिती लवकरात लवकर देण्याची आज्ञा देतात. त्यामुळे माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांना आता कायाद्याची भिती राहिली नाही. आम्हाला असे वाटते की ''नेता-बाबु'' विधीनिक्षेपाचा हा एक कट आहे जेणेकरुन माहिती अधिकार अधिनियमाचा अंत करणे आहे.

ह्या गोंधळात गोंधळ म्हणजे श्री. नमित शर्मा यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली की माहिती आयुक्तांची निवड पारदर्शक नाही. निकालात सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की सर्व माहिती आयुक्त हे विधीग्राह्य असतील व सुनावण्या दोन सभासदांच्या खंडपीठासमोर होईल. या निकालाचा परिणाम म्हणजे नवीन आयुक्तांची नियुक्ती होत नाही कारण केंद्र सरकारने निकाला विरुध्द सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. गोवा व मध्य प्रदेशात माहिती आयुक्त नाहीत. उत्तर प्रदेशात ११ पैकी ३ माहिती आयुक्त कार्यरत आहेत. या खटल्यात माजी केंद्रीय माहिती आयुक्त शैलेश गांधी यांनी पुनर्विलोकन याचिका सादर केली आहे. त्याची सुनावणी अजुन झाली नाही. हे सर्व पाहता, माहिती अधिकार अधिनियम अतिदक्षता विभागात आहे असे म्हंटले तर त्यात काय वावगे?

## तक्रार निवारण आणि सुशासनात द्विभाजन

सांख्यिकी माहिती प्रमाणे २०१२ साली भारतात २६ लाख लोकांनी माहिती अधिकाराचा वापर केला. महाराष्ट्रात ८ लाख लोकांनी भारतातील प्रांतांमधुन सर्वात जास्त माहिती अधिकाराचा उपयोग केला. त्यापैकी ९८ टक्क्याहून अधिक लोकांनी ह्या अधिनियमाचा उपयोग स्वत:च्या किंवा संस्थ्यांच्या तक्रारी निवारण करण्यासाठी केल्या. १/२ ते १ टक्के लोकांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या उद्देशांसाठी म्हणजे जनहितासाठी या अधिनियमाचा उपयोग केला. देशात एक ट्क्का म्हणजे फक्त २६००० आणि महाराष्ट्रात ८००० लोकांनी हा अधिनियम जनहित किंवा सुशासन, नागरिकांचे सबलीकरण किंवा भष्टाचार निर्मूलनासाठी केला. यावरुन दोन निष्कर्श आपण काढू शकतो: १. शासनाची तक्रार दाखल करणे व त्याचे नियंत्रण करणे याची यंत्रणा नाकाम ठरली आहे. २. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमाची तक्रारी निवारण करण्यासाठी जनता उपयोग करत आहे. हा दुरुपयोग तर आहेच पण ह्यामुळे आमच्या नेता-बाबू विधीनिक्षेपाचे फावते कारण त्यामुळे नागरिकांचे सबलीकरण होत नाही, सुशासन होत नाही, भ्रष्टाचार वाढतो आणि खऱ्या अर्थाने लोकशाही नागरिकांसाठी कार्यरत करणे दूरच राहते.

क्षितिजावर इंद्रधनुष्य दिसत आहे कारण शासनाने तक्रार निवारण अधिकार कायदा अमलात आणावयाचे ठरविले आहे. तो जर आला आणि त्याची अमलबजावणी बरोबर झाली तर नक्कीच त्याचा परिणाम माहिती अधिकार अधिनियमावर होऊन त्याचा जनहितासाठी वापर होईल. त्यामुळे सबलीकरण होईल, सुशासन होईल, भ्रष्टाचार कमी होईल आणि खऱ्या अर्थाने लोकशाही नागरिकांसाठी कार्यरत करणे शक्य होईल.

## माहितीच्या अभावी लोकशाहीवर विपरीत परिणाम

जर राजकीय उमेदवारांच्या कर्तुत्वाबद्दल माहिती नसेल तर कोण्त्या उमेदवाराला मत द्यावयाचे हे नागरिक कसे ठरविणार? ही वस्तुस्थिती आहे. शिकले सावरलेले लोक सुध्दा उमेदवाऱ्यांच्या कर्तुत्वाबद्दल माहिती नसताना आजुबाजुला विचारुन मते टाकतात. एक अंधळा दुसऱ्या अंधळ्याला मार्गदर्शन करण्याची जनतेची पाळी आली आहे असे म्हंटले तर ते चुकीचे ठरणार नाही. सर्वच उमेदवार त्यांच्या मतदार संघामधील चांगल्या बाबींचे श्रेय घेतात. ह्यावरुन खुन मारामाऱ्या सुध्दा होतात.

शेवटी मतदार जात, जमात, कुळ, गोत्र किंवा धर्म लक्षात ठेऊन मत देतो. मग आपल्याला सुशासन कसे मिळणार? त्यासाठी फक्त चांगल्या कर्तबगार उमेदवाराला मत द्यावयास पाहिजे. परन्तु आपल्या देशात, काही अपवाद सोडले तर बहुतांशी राजकीय पक्ष जात, जमात, कुळ, गोत्र किंवा धर्म याबाबींवर जोर देऊन निवडुन येतात. असा एकही राजकीय पक्ष नाही की जो फक्त नागरिकांचे सबलीकरण करण्याच्या किंवा सुशासन आणण्याच्या किंवा भष्टाचार निर्मूलन करण्याच्या मुद्यांवर निवडणुक लढवितो. ह्याच कारणामुळे आमचे सत्ताधारी माहिती अधिकार अधिनियमाला हळूहळू मृत्यु देण्याच्या प्रयत्नात आहेत. त्याच बरोबर देशाच्या धनसंपत्ती वाटपात भेदभाव करुन वोट ब्यांक बनविण्याच्या तयारीत आहेत.

आपण हे पाहिलेच आहे की सर्व सामान्य माणुस माहिती अधिकार अधिनियम स्वत:च्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी उपयोगात आणतो. म्हणुन प्रसारमाध्यमे आणि स्वयंसेवी संस्थांनी माहिती अधिकार अधिनियमाचा जास्तीत जास्त उपयोग करुन खरी वस्तुस्थिती जनतेसमोर मांडणे उचित होईल. मगच माहिती अधिकार अधिनियमाची उद्दिष्टे सफल होतील.

# भाग २ – भ्रष्टाचार

## भ्रष्टाचाराचे दुष्परिणाम

जागतिक बॅकेने केलेल्या अंदाजाने भ्रष्टाचारामुळे देशाची वाढ प्रतिवर्षी ०.५ ते १ टक्क्यानी कमी होते. म्हणजेच भारताचे प्रतिवर्षी रु. ५५० हजार काटींचे नुकसान होते. ग्लोबल फायन्यांशियल इंटेग्रिटी ह्या संस्थेच्या आकडेवारीप्रमाणे विकसनशील देश दर वर्षी १ शत अब्ज डॉलर्स भ्रष्टाचारामुळे गमावतात. ट्रांसपेरंसी इंटरनॅशनल ही स्वयंसेवी संस्था जनतेचा देशातील भ्रष्टाचाराबाबतचा समज (Corruption Perception Index-CPI) किती आहे हे १ ते १० निर्देशांकावर मोजते. ह्या निर्देशांकावरुन असे दिसते की ज्या देशात माहिती अधिकार जितका कार्यक्षमतापूर्वक कार्यरत आहे तिथे तितका भ्रष्टाचार कमी आहे. उदा: पहिल्या दहात खालील देशांचा नंबर लागतो: डेनमार्क, फिनलंड, न्युझिलंड, स्विडन, सिंगापुर, स्विट्झरलंड, ऑस्ट्रिया, कॅनडा, नेदरलंडस् आणि आईसलंड. या देशात माहिती अधिकार प्रभावी आहे. जिथे माहिती अधिकार अस्तित्वातच नाही असे देश शेवटात आहेत: हाईती, व्हेनेझुएला, इराक, ट्रकमेनिस्तान, उझबेकीस्तान, म्यानमार, सुदान, अफगाणिस्तान, उत्तर कोरिआ आणि सोमालिआ. भारताचे निर्देशांक खाली दिले आहेत.

सीपीआयमधे (CPI) भारताचे क्रमांकन व गुणसंख्या

| वर्ष | क्रमांकन | गुणसंख्या |
|---|---|---|
| २००५ | ७२ | २.९ |
| २००६ | ७२ | ३.५ |
| २००७ | ७२ | ३.५ |
| २००८ | ८५ | ३.४ |
| २००९ | ८४ | ३.४ |
| २०१० | ८७ | ३.३ |
| २०११ | ९५ | ३.१ |
| २०१२ | ९४ | ३.६ |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की भारतातील नागरिकांचा समज आहे की भ्रष्टाचाराची गुणसंख्या जरी वाढत असली तरी क्रमांकन १८० देशांमध्ये इतर देशांच्या मानानी घसरत आहे. २००५साली माहिती अधिकार अधिनियम येऊन सुध्दा असे का व्हावे ही बाब विचार करण्यासारखी आहे.

## उत्तरदाईत्वासाठी साधने

सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये उत्तरदाईत्व आणण्यासाठी काही साधने आहेत. ती अशी: नागरिकांचे प्रगतिपत्र, सामाजिक लेखापरीक्षा, अंदाजपत्रकाचे विश्लेषण इत्यादी. ह्या साधनांचा नीट वापर होण्यासाठी माहिती अधिकार अधिनियम उपयोगात आणला पाहिजे.

## जर भ्रष्टाचार नसेल तर?

जर भ्रष्टाचार नसेल तर भारताचा किती फायदा होईल याचा मागू इनफोटेक या कंपनीने अभ्यास करून आकडेवारी प्रसिध्द केली आहे ती अशी: पारदर्शकेतेमुळे एफ्. डी. आय. तिप्पट होऊन ७५ दश अब्ज डॉलर्स होईल. त्यामुळे आधारभूत संरचनेसाठी (infrastructure) १.७ शताब्ज डॉलर्स खर्च करता येतील. प्रकल्प वेळेवर पूर्ण होतील व त्यांचा दर्जा सर्वोत्तम असेल.

## भ्रष्टाचार होते आहे हे कसे ओळखावे ?

भ्रष्टाचाराची लक्षणे आहेत. जसे की निर्णय करण्यास नेहमी पेक्षा जास्त विलंब करणे, किंवा निर्णय लवकरात लवकर घेणे जे सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये होत नाही, निर्णय घेण्यात पारदर्शकता नसणे, वस्तुस्थिती नाकारणे, कायदे वापरण्यात भेदभाव करणे व पक्षपात करणे किंवा पुन्हा पुन्हा प्रस्तावात फेरबदल करुन मंजुरीसाठी पाठविणे.

परन्तु नागरिकाने विसरु नये की भ्रष्टाचाराबद्दल ठोस पुरावा माहिती अधिकारात मिळणे जवळ जवळ अशक्यच असते. तेव्हा परिस्थितीजन्य पुराव्यावर अवलंबुन रहावे लागते. आणि म्हणुनच प्रशासकीय व राजकीय पाठिंब्याची भ्रष्टाचार निर्मूलनासाठी गरज असते. हा पाठिंबा नसला तर भ्रष्टाचाराच्या घटना दाबल्या जातात. आमचा अनुभव आहे की प्रशासन व राजकीय नेते नेहमीच भ्रष्टाचार कसा लपवावा ह्याकडे लक्ष देतात. सत्ताधारी सक्रियरत्या व विरोधी पक्ष निष्क्रिय रित्या आरोपींना पाठबळ देतात. फारच क्वचित भ्रष्टाचार प्रशासनाच्या किंवा राजकीय नेत्यांमुळे बाहेर येतो किंवा आरोपींना शिक्षा होते. म्हणुन नाइलाजाने नागरिकांना न्यायालयाची दारे ठोठवावी लागतात. आपल्या देशाची यंत्रणा व प्रणाली अशी आहे की ती भ्रष्टाचारी लोकांना न्याय मिळवून देण्यात उशीर लावते.

## भ्रष्टाचार व न्यायालये

नागरिक चेतना मंचाने सर्वोच्च न्यायालयात १ जनहित याचिका, उच्च न्यायालयात ३ जनहित व एक रिट पिटिशन फाईल केले आहेत. त्याचप्रमाणे खालच्या कोर्टात दोन दिवाणी व एक फौजदारी खटले जनहितासाठी दाखल केले आहेत. सर्व खटल्यात माहिती अधिकार अधिनियम २००५ चा जास्तीत जास्त उपयोग करण्यात आला आहे. नाहीतर हे खटले केव्हाच डिसमिस झाले असते. याचिका गेली कित्येक वर्षे चालू आहेत. काही धडे आम्ही शिकलो ते पुढील प्रंमाणे आहेत:

१. खालच्या कोर्टातील बेलीफ हे कार्यक्षमतापूर्वक नाहीत किंवा भ्रष्टाचारात निपूण आहेत कारण कोर्टातून पाठविलेले समन्स् वेळेवर पोहोचत नाहीत किंवा कधीच पोहोचत नाहीत. मग आम्हाला कोर्टाला आमच्याच पैशातून रजिस्टर एडीने समन्स् पाठवायची परवानगी घ्यावी लागते. ते सुध्दा पोहोचत नाही कारण ते कोर्टातून बेलीफतर्फेच जाते. त्यानंतर बेलीफकडून आरोपीच्या दारावर नोटीस चिकटविण्यासाठी कोर्टाची परवानगी घ्यावी लागते. त्यानंतर स्वखर्चाने वर्तमानपत्रातून जाहिरात देण्यासाठी कोर्टाची परवानगी घ्यावी लागते. ही संपूर्ण प्रक्रिया संपेपर्यंत वषानुवर्षे जातात. आमच्या २००५ पासुनच्या याचिकेची सुनावणी अजुन सुरू झालेली नाही.

२. उच्च व सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशांवर कामाचा खुपच बोज असतो. त्यामुळे सुनावणीसाठी बोर्डवर नंबरच लागत नाही. ज्यावेगाने नवीन घोटाळे उघडकीस येत आहेत त्यावेगाने नायालयीन निकाल लागणे शक्यच नाही.

३. विचार करण्याची बाब आहे की इतके घोटाळे का होतात आणि घोटाळे उघडकीस येतात तोवर पैसा गायब झालेला असतो. आमचे मत आहे की यासाठी प्रशासन सक्षम करण्याची गरज आहे. त्याच बरोबर राजकीय नेत्यांनी सुध्दा एखादा घोटाळा बाहेर आला तर तो प्रशासनाच्या स्तरावर निकाली काढण्यात यावा म्हणजे माहिती अधिकार अधिनियम याचा जनतेला फायदा होईल व भ्रष्टाचार कमी होऊन नागरिकांना सबलीकरण केले जाईल. त्यामुळे सुशासन येईल व नागरिकांचा लोकशाहीत अर्थपूर्ण सहभाग होईल.

## कलम ४, माहिती अधिकार अधिनियम

कलम ४ अंतर्गत सर्व निर्णय ज्यामुळे नागरिकांवर परिणाम होतो त्या त्या बाबी स्वत:हून सार्वजनिक प्राधिकरणाने उघड करावयास हव्यात. याचबरोबर निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येण्याऱ्या कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण, आणि उत्तरदायित्व प्रणाली प्रसिध्द होणे भाग आहे. अशा एकुण १७ बाबी कायद्यात कलम ४ अंतर्गत दिल्या आहेत. आम्ही खाली काही महत्वाचे मुद्दे जे कलम ४ खाली प्रसिध्द होणे गरजेचे आहेत ते देत आहोत ज्यामुळे सुशासन आणि नागरिकाचे सबलीकरण होण्यास मदत होईल.

१. सगळे निर्णय, परिपत्रके, राज पत्रे, तपशीलवार प्रकल्प अहवाल, इत्यादी.

२. सर्व प्रस्ताव, सर्व कागदपत्रे जी सक्षम अधिकाऱ्याला देण्यात येतात ती.

३.प्रारूप अंदाज पत्रक, मंजूर झालेले अंदाज पत्रक आणि वेळोवेळी केलेले बदल.

४. न्यायालयांचे सर्व निर्णय व त्यावर केलेल्या कार्यवाही बदल सर्व माहिती.

५. निरनिराळ्या प्रकल्पांमध्ये मंजुर झालेल्या लाभार्थींची संपूर्ण माहिती.

## पुण्यात कलम ४ प्रमाणे केलेल्या तरतूदी

१. दर सोमवारी दुपारी ३ ते ५ आपली ओळख पटवून कोणतेही दस्तऐवज पुणे महापलिकेत पाहता येतात. कलेक्टर पुणे यांच्या महसूल विभागात तसेच दर शुक्रवारी दस्ताऐवज पाहता येतात.

२. कागद पत्रांची प्रत हवी असल्यास तिथेच अर्ज करुन प्रत मिळू शकते.

३. पुणे मनपात माहिती अधिकाराचे वाचनालय उघडले आहे. त्यात सर्व दस्ताऐवज, निर्णयासह ठेवले जातात. नकाशे सुध्दा पहावयास मिळतात.

## कलम ४ योजनेतल्या त्रुटी

वरील योजनेत खाली दिलेल्या त्रुटी आहेत:

१. आथिक निर्णयाच्या प्रती ठेवल्या जात नाहीत.

२. वरील योजनेमुळे माहिती अधिकाऱ्यांना, ‘ऑफिसला या व फाईली पहा’’ असे लेखी उत्तर नागरिकाने कलम ६ अंतर्गत अर्ज केला तरी दिले जाते. नागरिकाला त्याने मागितलेली माहिती कोठल्या नस्तीत आहे हे माहित नसते व माहिती अधिकारी नागरिकांना व्यवस्थित मार्गदर्शन करत नाहीत. त्यामुळे महत्वाचे कागदपत्रे मिळण्यात दिरंगाई होते. कधी कधी मिळतपण नाहीत.

### प्रकरण अध्ययन

१. वैष्णोदेवी अभ्यास दौरा: पुणे मनपाच्या स्त्री व बाल कल्याण समितीचा वष्णोदेवी, अमृतसर, डलहौसी व दिली अभ्यास दौरा. अहवाल सादर केला नाही, दिल्लीमध्ये प्रकल्पांना भेट दिली हे खोटे लिहून दिले. आम्ही महानगरपालिक दिल्ली यांच्याशी माहिती अधिकारात संपर्क साधला. त्यांनी लिहून दिले की पुणे मनपाकडुन कोणतेही प्रतिनिधी मंडळ दिल्लीत आले नाही. खटला २००५ सालापासून नगरपलिका न्यायलयात खटला चालू आहे

२. बस रॅपिड ट्रांसिट पथदर्शी प्रकल्प: १२ वोल्वो बसगाड्या प्रत्येकी रु. ८५ लाख देऊन रु. १० कोटी देऊन खरेदी केल्या. पहिल्यांदा महाव्यवस्थापकांनी प्रस्तावात मांडले की पुण्यात एसी वाल्वो बसगाड्यांची गरज नाही. बरोबर एक आठवड्यात प्रस्तावात बदल की पुण्यात वोल्वो एसी

बसगाड्याच हव्यात. त्यात असेही लिहले की त्यांनी प्रस्ताव वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आज्ञेनुसार तयार केला आहे.
३. हस्तांतरीत विकास हक्क: ४२१०० चौ.मि. जागेचा पुणेमनपाच्या इतिहासातील सर्वात मोठा टीडीआर् १९८१ च्या अगोदरच्या जमिनींना टीडीआर् लागू नसताना दस्त ऐवजात खाडाखोड करुन जमीनीचा मोबदला देऊन, विकसित केली असताना परत त्याच्या मोबदल्यात ४२१०० चौ. मि. टीडीआर् घेण्याचा प्रयत्न आम्ही माहिती अधिकार अधिनियमाचा उपयोग करून थांबवला. लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने पहिल्या अहवालात आयुक्त आणि नगर अभियंतांवर प्रतिकूल शेरे मारले होते. तो रिपोर्ट मुंबईतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आज्ञेनुसार दाबला गेला. आम्ही तो माहिती अधिकार अधिनियमाचा उपयोग करुन मिळविला. त्यामुळे या जनहित याचिकेला निराळेच वळण लागले आहे. खटला २००६ सालापासून उच्च न्यायालयात चालू आहे.
४.कोंढवा: २९ एकर राखीव वन अनधिकृत रित्या निवासी क्षेत्र बनविले. जवळ जवळ एक वर्ष माहिती मिळविण्यात गेला. शासनाच्या विधी सल्लागाराचा अभिप्राय मिळता मिळेना. परंतू एक वनाधिकाऱ्यानी स्वत:हुन आम्हाला आणून दिला. असा अनुभव आम्हाला वारंवार आला की प्रशासनातीलच प्रामाणिक माणसे जी माहिती आम्हाला माहिती अधिकार अधिनियमात मिळाली नाही ती त्यांनी आम्हाला घरपोच केली! हा खटला सर्वोच्च न्यायालयात २००७ सालापासून चालू आहे.
५. उड्डान पुल: सल्लागाराच्या अहवालाबाबत तपासाअंती लखात आले की अहवाल कपटपणा करून तयार केला आहे. ज्या MAV गाड्या लांबीत ९ मीटर (३० फुट) पर्यंत असतात आणि ज्या गाड्यांना वळायला जागा नाही अशा १६२ गाड्या दररोज वळतात असे अहवालात लिहले आहे. हा तिसरा पुणे मनपा सल्लागारांचा अहवाल आहे ज्यात आम्ही पुराव्यासकट भयंकर चुका प्रशासनाच्या लक्षात आणले आहेत. आम्हाला निर्लज्जपणे सांगण्यात येते की अश्या बाबीत न्यायालयात जावे. आम्ही २००८ साली जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली आहे. निकालाची आम्ही वाट पाहत आहोत!

मेजर जनरल एस्. सी. एन्. जटार, निवृत्त
अध्यक्ष, नागरिक चेतना मंच
१०२ नील सदन
१४२६ सदाशिव पेठ
पुणे ४११०३०
दुरध्वनी: ०२०२४४७५३६६
मोबाईल: +९१९९७००९३५३३
१५ एप्रिल २०१३